# उषा खन्ना - भाग २



आता तिचं बस्तान बसल्यासारखं वाटत होतं. 'फ्लॅट नं. ९' मध्ये मजरुहनी लिहिलेलं सुमधुर 'धीरे चलो मोरे सैया' (लता), आणि 'गा दिवाने झूम के, रात का जुल्फे चुमके' (मुकेश). त्यानंतर मात्र का कोण जाणे, पण तीन वर्षांचा खंड पडला आणि मग 'आवारा बादल' आला. पण त्यातली गाणी काही खास नव्हती. 'दिल देके देखो' नंतर खरं तर तिला किमान डझनभर तरी चित्रपट मिळायला हवे होते असं वाटतं ना? पण १९६४ मध्ये 'फिल्मालय'चा 'आओ प्यार करे' आला आणि त्यात राजेंद्र कृष्ण यांनी लिहिलेली काही अविस्मरणीय गाणी होती. 'जहाँ तू है वहा फिर चांदनी को कौन पूछेगा' (रफी), 'तमन्नाओंको खिलने दे' (लता) आणि 'दिलके आईनेमे तसवीर तेरी रहती है' (रफी). त्याच्या पुढच्या वर्षी तिने 'शबनम'ला संगीत दिले : 'ये तेरी सादगी, ये तेरी बाँकपन' (रफी), 'तेरी निगाहोंपे मर मिट गये हम' (मुकेश) आणि 'मैने रख्खा है मुहब्बत अपने अफसाने का नाम' (रफी).

'एक सपेरा एक लुटेरा' (१९६५) मध्ये रफीसाठी तिने सुंदर गाणी संगीतबध्द केली : 'हम तुमसे जुदा होके, मर जायेंगे रो रो के'. 'फैसला' (१९६५) मध्ये उषा स्वत:च्या संगीतावर कोरसमध्स्वये त:च गायली - 'फूलोंका रंग मौसम की जान हम है'. आणि इतर गाणीही ती चांगली गायली. त्यानंतर, तिने संगीत दिलेल्या बऱ्याच चित्रपटांमध्ये ती गायली. 'मै हूँ अल्लादिन'चं (१९६५) टायटल साँग. नंतर परत १९६५ मध्ये 'निशान' मध्ये रफी/आशासाठी तिने एक छान गाणं संगीतबध्द केलं : 'हाये तबस्सुम तेरा'.

परत 'Alibaba & Forty Thieves' (१९६६) मध्ये रफीसाठी एक सुंदर गाणं दिलं : 'बनाये जा बिगाडे जा, बिगाडे जा बनाये जा, हम तेरे चिराग है'. 'बादल' (१९६६) मध्ये मन्ना डे साठी उषा खन्नाने 'अपने लिये जिये तो क्या जिये' हे गाणं स्वरबध्द केलं. आता तिने बऱ्याच चित्रपटांना संगीत दिलं. त्यांतली काही गाणी बरी होती पण बरीचशी ऐकून वाटायचं की 'दिल देके देखो'ची संगीत दिग्दर्शिका कुठे गेली ? 'इन्साफ', 'खून का खून', 'लाल बंगला' ('हसीन वादियों...फिजाओंसे कहदो, हवाओंसे कहदो'/रफी आणि 'चाँद को क्या मालूम चाहता है उसे कोई चकोर'/मुकेश), 'मै वही हूँ', 'आग',

‘दिलरुबा’ हे त्या चित्रपटांपैकी काही. या आणि नंतरच्याही काही चित्रपटांमध्ये ती स्वत:ही बऱ्याचदा गायली आणि कृष्णा कल्ले, सुमन, उषा मंगेशकर, उषा टिमोथी, हेमलता, इ.ना देखील बरीच गाणी दिली, पण त्यातली बहुतेक गाणी लक्षात ठेवण्याजोगी नव्हती. तिने आणखीही काही टाकाऊ चित्रपटांना संगीत दिलं - ‘एक रात’, ‘जोहर इन बाँबे’, ‘मेरा नाम जोकर’, ‘रात अंधेरी थी’, ‘सरदार’, ‘रुप रुपय्या’, ‘अनजान है कोई’, ‘बंदिश’, ‘हम एक है’, ‘नतिजा’ आणि असेच आणखी काही रद्दड चित्रपट. मधेच एखाद्या चित्रपटात एखादं बरं गाणंही दिलं, उदा. ‘बरखा रानी, जरा जमके बरसो’ (‘सबक’, मुकेश)

निर्माता-दिग्दर्शक सावनकुमार टाक ह्याच्याशी तिचं लग्न झालं होतं. त्यामुळे तेव्हा आणि त्याच्यापासून विभक्त झाल्यावरही तिने त्याच्या चित्रपटांना संगीत दिलं. शिवाय त्याच्या चित्रपटांत तिने काही नवोदित गायक-गायिकांना प्रथमच संधी दिली. अनुराधा पौंडवाल (‘साजन बिना सुहागन’ मध्ये येसुदाससह ’मधुबन खुशबू देता है’) सारख्यांना तर चांगलीच संधी मिळाली. १९८३ मध्ये तिने ‘सौतन’ला संगीत दिलं, ज्यात ‘शायद मेरी शादी का खयाल’ (किशोर आणि लता) आणि ‘जिंदगी प्यार का गीत है’ (किशोर, लता) ही गाणी होती. आणि ‘आप तो ऐसे न थे’ मधलं ‘तू इस तरह से मेरी जिंदगी मे शामील है’ (रफी, हेमलता, मनहर). तसंच ‘तेरी गलियोंमे ना रख्खेंगे कदम’ (‘हवस’ मध्ये रफी). तिच्या संगीत दिग्दर्शनाचा दर्जा परत सुधारला होता.

नंतर ती संसार सोडून बाहेर पडली. ती म्हणायची की लग्न करून तिने मोठी चूक केली होती. पण संगीताचं क्षेत्र निवडणं ही नक्कीच चूक नव्हती. संगीत दिग्दर्शनातून तिला अतिशय समाधान मिळायचं आणि थोडंफार यशही. खूप कमी महिला संगीत दिग्दर्शकांपैकी ती एक होती. तिची कारकीर्द साधारण चाळीस-एक वर्षं चालली. स्त्री किंवा पुरुष कुणाच्याही बाबतीत चाळीस वर्षांची कारकीर्द बरीच मोठी आहे !

उषा खन्ना निर्धास्तपणे वर्तमानपत्रं/नियतकालिकांच्या प्रतिनिधींना भेटायची, तसंच टी.व्ही. वरही यायची, कधी कधी टी.व्हीवरील गायनस्पर्धांची परीक्षकही व्हायची.

२००३ सालाच्या अखेरीस तिने ‘दिल परदेसी हो गया’ या चित्रपटाला संगीत दिलं. म्हणजे तिची संगीत कारकीर्द (थोडा खंड सोडून) ४५ वर्षांची होती. हा नौशादच्या खालोखालचा उच्चांक म्हणता येईल.

(समाप्त)

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून)

NOTE: Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least. “Yesterday's Melodies Today's Memories” is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was “Musical Moments From Hindi Films”, which celebrated 75 years of sound (and music) in Hindi Films. The author next wrote another music book called “Romancing The Song”, which traces the history and changing face of lyrics in Hindi Cinema, right from 1931 till now.

After that, he wrote a third of the biography of the santoor maestro Pandit Shiv Kumar Sharma, outlining in some details the great musician’s role in Hindi cinema, both as an instrumentalist and a composer.

His latest book “Talat Mahmood, The Velvet Voice” was released in May 2015. To buy his books, or otherwise write to the author, his email address is manekpremchand@gmail.com